**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (एच) व४(१) (बी) नुसार १७ बाबींवर प्रसिद्ध करावयाची परिमंडळ - १ विभागाची माहिती खालीलप्रमाणे आहे**

**कलम (२) एच-नमुना (क)**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विभागवार लोकप्राधिकारी यांची यादी

**सार्व. प्राधिकरणाचे नांव :- परिमंडळ - १ विभाग, नवी मुंबई महानगरपालिका.**

| अ.क्र. | सार्वजनीक प्राधिकरणाची निर्मितीकारानुसार विभागणी. | सार्वजनिक प्राधिकरणाचे नांव | ठिकाण / संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| १ | परिमंडळ-१ | नवी मुंबई महानगरपालिका (महाराष्ट्र शासन राजपत्र-दि. १७/१२/१९९१.) | नवी मुंबई महानगरपालिका, पहिला मजला, बेलापूर भवन, सेक्टर-११, सी.बी.डी., बेलापूर,नवी मुंबई-४००६१४ |

**कलम (२) एच-नमुना (ख)**

भरीव प्रमाणात शासकीय अर्थ साहाय्य मिळत असलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाची यादी.

| अ.क्र. | सार्वजनीक प्राधिकरणाची अर्थसाहाय्यानुरुप विभागणी. | सार्वजनीक प्राधिकरणाचे नांव | ठिकाण / संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| १ | स्थानिक स्वराज्य संस्था | नवी मुंबई महानगरपालिका, | नवी मुंबई महानगरपालिका, भूखंड क्र.१, किल्ले गांवठाण जवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर-१५ए, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ |

**कलम ४ (१) (बी) (i)**

**नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिमंडळ-१ विभागाचा कामांचा आणि कर्तव्यांचा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | सार्व. प्राधिकरणाचे नाव | नवी मुंबई महानगरपालिका |
| २ | सक्षम अधिकारी | महापालिका आयुक्त |
| ३ | संपूर्ण पत्ता | नवी मुंबई महानगरपालिका<br>भूखंड क्र.१, किल्ले गांवठाण जवळ,<br>पामबीच जंक्शन, सेक्टर-१५ए, सी.बी.डी., बेलापूर,<br>नवी मुंबई-४००६१४ |
| ४ | विभाग प्रमुख | श्री. डी.एस. चाबुकस्वार |
| ५ | कोणत्या खात्याच्या अंतर्गत हे कार्यालय आहे ? | नवी मुंबई महानगरपालिका. |
| ६ | कामाचा अहवाल कोणत्या कार्यालयाकडे सादर केला जातो? | मा. आयुक्त, (नमुंमपा) |
| ७ | कार्यकक्षा : भौगोलिक | बेलापूर ते वाशी |
| ८ | अंगीकृत व्रत (Mission) | वाहने व मानवी रहदारीसाठी चांगल्या प्रतीचे रस्ते व पदपथ उपलब्ध करुन देणे. पुरेसे पथदिवे उपलब्ध करुन देणे, जीवनासाठी स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करुन देणे. प्रौढ व ज्येष्ठ नागरिकांसाठी चांगली उद्याने, मुलासाठी खेळाची मैदाने उपलब्ध करुन देणे. सार्वजनिक ठिकाणी चांगल्या दर्जाची शौचालये उपलब्ध करुन देणे. सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे. महानगरपालिकेची पाणी पुरवठा व्यवस्था उभी करणे व त्याची निगा राखणे, वाहनतळाकरिता जागेची तरतूद करणे, जलकुंभ मुताऱ्या व समाजमंदिराची निर्मिती करणे. जाहिराती व जाहिरात फलकांवर नियंत्रण ठेवणे. |
| ९ | ध्येय धोरण (Vision) | सर्वांगीण पायाभुत विकास व सर्वोत्तम नागरी सुविधा उपलब्ध करून देणे. |
| १० | साध्य | - |
| | | १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम ४९ प्रमाणे निहीत अधिकार व कर्तव्ये पार पाडणे.<br>२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ संबधित कार्य पार पाडणे.<br>३) प्रभाग निधी / नगरसेवक निधी प्रस्ताव सादर करणे त्यासंबधित कामकाज पहाणे कार्यवाही करणे.<br>४) लोकशाही दिन संबधित कामकाज पहाणे.<br>५) स्मशानभूमी, सार्व. शौचालये व त्या अनुषंगिक सर्व बाबींची कार्यवाही पार पाडणे.<br>६) महाराष्ट्र प्लास्टीक पिशवी (कॅरीबॅग) (वापर, साठा व उत्पादन) नियम २००१ नुसार प्लास्टीक पिशव्या बंदी संबधित कार्यवाही करणे.<br>७) परिमंडळ-१ अंतर्गत विभाग कार्यालयाकडील कामकाजावर देखरेख ठेवणे, विभाग कार्यालयास भेटी देवून विभाग कार्यालयाकडील दप्तरांची प्रशासकीय दृष्ट्या पडताळणी व तपासणी करणे.<br>८) महानगरपालेमार्फत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांवर नियंत्रण ठेवणे.<br>९) हगणदारीमुक्त शहर अभियान राबविणे.<br><br>**ध्येय**<br>क) **रस्ते व पदपथ** - बांधलेले सर्व रस्ते खड्डेमुक्त तसेच वाहनांची चाके व रस्ता यांत कमी घर्षण होणारे, योग्य वक्रता असणारे, डांबरी असावेत. सार्व. रस्ते, पुल, भुयारी मार्ग, भुमिगत विजेच्या तारा व नळ यांची बांधणी तसेच निगा राखणे आवश्यक असल्यास त्यात फेरबदल करणे व सुधारणा करणे. अडथळामुक्त व योग्य पातळीवरील पदपथ उपलब्ध करुन देणे.<br>ख) **पथदिवे** - सार्व. रस्ते, महापालिकेच्या बाजारपेठा, महापालिका हद्दीतील सार्व. इमारती येथे पथदिव्यांची सोय करणे. ३५ ते ४० प्रकाश तिव्रतेच्या जोडणीसह पुरेशा संख्येने विजेचे खांब पुरविणे.<br>ग) **घनकचरा व्यवस्थापन** - शहरातील सर्व ठिकाणे, रस्ते यांची साफसफाई करणे. ओला व सुका कचरा यांचे निर्मितीच्या ठिकाणीच पृथक्करण करणे. कमीत कमी सार्व. कचराकुंड्या ठेवणे.<br>घ) **पाणी** - महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा व्यवस्थेचे व्यवस्थापन व निगा राखणे. सार्वजनिक व खाजगी गरजोसाठी आवश्यक पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी नवीन प्रकल्पांची बांधणी व अधिग्रहण करणे. सर्व नागरिकांकरीता योग्य दाबाने स्वच्छ व शुध्द पाणी पुरवठा करणे.<br>ड) **वाहनतळ** - रहदारीच्या मार्गावर वाहने व मानवी वाहतूक सुरळीतपणे व्हावी याकरीता वाहने उभी करण्यास प्रतिबंधित क्षेत्र निर्माण करण्यासाठी पुरेसे वाहनतळ क्षेत्र उपलब्ध करुन देणे.<br>च) **उद्याने व खेळाची मैदाने** - हरीत व स्वच्छ सुंदर उद्याने व मनोरजन केंद्रे उपलब्ध करुन देणे.<br>छ) **सांडपाणी** - सार्व. शौचालये व मल:निस्सारण, केरकचरा व मैला एकत्रित करुन त्याची विल्हेवाट लावणे. सांडपाणी व्यवस्था, सार्व.शौचालये, मुताऱ्या यांची बांधणी करणे. त्यांची स्वच्छता ठेवणे व योग्य निगा राखणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ज) **आरोग्य** - जन्म, मुत्यु व विवाहाची नोंदणी करुन नागरिकांना किमान वेळेत त्याचे प्रमाणपत्र प्रदान करणे. (मुतदेहाची विल्हेवाट लावण्याच्या जांगा) स्मशानभूमीची निगा राखणे व त्यांची व्यवस्था पाहणे. वरील उद्देशांसाठी नवीन जागांची तरतुद करणे तसेच बेवारस मृतदेहांची योग्य विल्हेवाट लावणे. अस्वच्छ वसाहतीचे पुर्नवसन, विषारी झाडे झुडपे तसेच अशोभनीय बाबी हटविणे.<br>झ) **अतिक्रमण** - सार्व. रस्त्यांवरील अनधिकृत बांधकामे ओळखून MRTP कायद्याअंतर्गत १९६६ अंतर्गत त्यांना सूचनापत्र देऊन ती हटविणे. महानगरपालिकेच्या जागांवरील अतिक्रमणे ओळखून ती हटविणे. अनधिकृत फलके व अन्य अनधिकृत कामे हटविणे.<br>ञ) **मालमत्ता** - महानगरालिकेची मालमत्ता सुचित करुन तिचे रक्षण करणे. परवानाधारक भाडेकरुनकडून मासिक भाडे वसुल करुन घेणे.<br>ट) **वित्तीय** - विभागनिहाय अंदाजपत्रक तयार करणे, आवश्यक गरजाचे नियत्रंण ठेवणे, खाते निहाय संहितेप्रमाणे खर्च करणे. योग्य दस्ताऐवजांची निर्मिती करणे.<br>ठ) **मालमत्ता कर** - सर्वेक्षण, मुल्यांकन, सुनावणी, वाढीव मागणी सुचनापत्र देयके अदा करणे व मालमत्ता कराची वसुली.<br>ड) **संमिश्र** - विविध शासकीय कार्यक्रमांचे पर्यवंक्षण व समन्वयन (उदा. जनगणना, राष्ट्रीय लोकसंख्या रजिस्टर, मराठा आरक्षण, सर्वेक्षण, वृक्षगणन श्वान गणना, पक्षी गणना. |
| १३ | जनतेला देत असलेल्या सेवांचा थोडक्यात तपशिल | १) सार्वजनिक शौचालय देखभाल दुरूस्ती.<br>२) स्मशानभूमी देखभाल दुरूस्ती निगा व परिचलन.<br>३) मोफत अंत्यविधी योजना.<br>४) पे ॲण्ड पार्क योजना<br>५) पाणी पुरवठा करणे<br>६) रस्ते<br>७) पदपथ<br>८) जन्म व मृत्यू दाखला<br>९) अंत्यविधी दाखला<br>१०) मालमत्ता हस्तांतरण<br>११) ८ चा उतारा |
| १४ | स्थावर मालमत्ता (येथे तुमच्या प्राधिकरणाची जमीन , इमारत आणि अन्य स्थावर मालमत्तेचा तपशिल द्यावा) | --- |
| १५ | प्राधिकरणाच्या संरचनेचा तक्ता (वंशवृक्षाचा तक्ता जसा असतो तसा तक्ता काढून प्रत्येक पातळीवरकार्यकक्षा व संपर्काच्या पत्याशी त्याची जोड घालून दाखवावी) | खाली नमुद केल्याप्रमाणे |
| १६ | कार्यालयाची वेळ आणि दुरध्वनी क्रमांक(सर्व दुरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक, ई-मेल आणि कार्यालयीन कालानंतर संपर्काचा तातडीचा क्रमांक असेल तर तोही क्रमांक द्यावा) | वेळ सकाळी : १०.०० ते ५.४५<br>दुरध्वनी क्रमांक : ०२२२७५७७०७०<br>फॅक्स क्रमांक : २७५७३७८५ |
| १७ | साप्ताहीक सुट्टी आणि विशेष सेवांचा कालावधी | महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार, महिन्यातील सर्व रविवार व शासकीय सार्वजनिक सुट्या. (विशेष सेवा:- आवश्यकतेप्रमाणे) |

कलम ४ (१) (बी) (i) (अनु. क्र. १४)

**परिमंडळ -१ विभागाची सर्वसाधारण रचना :-**

**महापालिका आयुक्त**

**अतिरिक्त आयुक्त (शहर)**

**उप आयुक्त (परिमंडळ-१)**

**कार्यकारी अभियंता(बेलापूर/नेरुळ/वाशी/तुर्भे)**

**सहा. आयुक्त (परिमंडळ-१)**

उप अभियंता

शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता

अधिक्षक लघुलेखक(नि. श्रेणी) उपलेखापाल व.लि./लेखा व. लि. /क.नि. लि./टंकलेखक/मा.नो.लि.

शिपाई